**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात...**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/८६/२०२४

दिनांक- २४.०२.२०२५

**प्रति,**

१. विलास धोंडी कोडग
   रा. आवंढी ता.जत जि.सांगली

**विरुध्द**

१. परशराम दत्तू कोडग
२. रामचंद्र बाबासाहेब कोडग
३. शितल धनाजी कोडग
४. विनायक धनाजी कोडग
५. धनश्री धनाजी कोडग
६. मारूती रंगराव कोडग
७. हिराबाई रंगराव कोडग
८. तुळसाबाई बाजीराव कोडग
९. संजय बाजीराव कोडग
१०. नवनाथ बाजीराव कोडग

सर्व रा.आवंढी ता.जत जि.सांगली ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. आवंढी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ५० या मिळकती संदर्भात तहसिलदार जत, यांनी क्र.हनो/कलम/१५५/एसआर/३६/२०२३, दिनांक १६.०२.२०२४ रोजीच्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकतीचा सन १९५० ते १९७० पर्यंतचा स.नं.१५/५ चे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन व निरिक्षण करता सदर ७/१२ उताऱ्यावर खालीलप्रमाणे प्रत्येकाची आणेवारी नोंद आहे. नाना अन्याबा कोडग 6२ 6८ (दोन आणे आठ पै) गोजाबा आप्पाजी कोडग 6२७८ (दोन आणे आठ पै) तायाप्पा राणु कोडग 6१ 6८ (एक आणे चार पै) धोंडी धारु कोडग 66११ (आकरा पै) रामचंद्र भिमा कोडग 66११ (आकरा पै) सदाशिव रामजी कोडग 6८ (आठ पै) आनंदा रामजी कोडग सदर नोंदी प्रमाणे धोंडी धारु कोडग यांचा सदर जमीनी मध्ये जर 66११ (आकरा पै) चा हिस्सा आहे. तर सदर आणेवारी प्रमाणे हिशोब करता धोंडी धारु कोडग यांचे क्षेत्र केवळ ००.०६ गुंठे होते. जाबदार नं. १ चे वडील कै. दत्तु पांडु कोडग यांचे दिनांक २ ऑगष्ट १९५५ चे खरेदी दस्तः स.नं.१५/५ चे स.नं.१९५० ते १९५६ चा ७/१२ उतारा पाहाता त्याचे एकुण क्षेत्र २ एकर ३१ गुंठे व त्याशी आकरा १ रुपया ५ पैसे असे स्पष्ट नोंद आहे.

२. दि. २ ऑगष्ट १९५५ चे दस्तातील स.नं.१५/५ चे मिळकतीचे क्षेत्र व आकार पाहाता त्यामध्ये स.नं.१५/५ चे एकुण क्षेत्र २ एकर १० गुंठे, पोट खराब ००.०१ गुंठा व आकार ००.१८ पैसे असे चुकीचे नमुद केलेले आहे. त्याचप्रमाणे सन १९८० ते १९५६ चे ७/१२ उताऱ्यावर धोंडी धारु कोडग यांचे क्षेत्र केवळ 66११ (आकरा पै) आहे. दि. २ ऑगष्ट १९५५ चे खरेदी दस्तात धोंडी धारु कोडग यांचे चुकीचे क्षेत्र 6२6८ (दोन आणे आठ पै) असे दर्शविले आहे. या बाबीचा विचार करता दि. २ ऑगष्ट १९५५ चे खरेदी दस्त हाच मुलतः बेकादेशीर व रद्द बातल आहे हे स्पष्ट भणे दिसुन येते.

३. दि.२ ऑगष्ट १९५५ चे दस्ताचे अभिलेख सदरी नोंदी बाबतः- वास्तविक दि. २ ऑगष्ट १९५५ रोजी जाबदार नं. १ चे वडीलांनी केले खरेदी दस्तातील स.नं. १५/५ चे क्षेत्राचा ७/१२ अभिलेखा प्रमाणे ताळमेळ

होत नसलेने सदर दस्ताची नोंदच हक्क पत्रकी धरणेत आलेली नव्हती व नाही ही बाब जाबदार नं.१ यानी कोर्टापासुन लपविलेली आहे.

४. जुना स.नं.१५/५ म्हणजेच चालु ग.नं.५० चे धारका मध्ये सन १९९३ मध्ये आपसात वाटप झाले. सदर वाटपात मुळ मालक कै. धोंडी धारु कोडग यांचा मुलगा म्हणजे अपिलार्थी श्री.विलास धोंडी कोडग यांचे हिस्सेला ग.नं.५० मध्ये ८९ ७१० (नऊ आणे दहा पै) म्हणजेच ००.५० आर क्षेत्र देणेत आले.त्या प्रमाणे अपिलार्थी यांची तेवढे क्षेत्रात निर्विवाद पणे वहिवाट चालु झाली.

५. फेरफार नं.८०२:- अपिलार्थी यांचे सन १९९३ चे वाटपा प्रमाणे क्षेत्र वाढले नंतर जाबदार नं.१ यानी चाणाक्ष पणे, सत्यवस्तुस्थिती महसुल अधिकारी यांचे पासुन लपवुन बेकायदेशीर पणे दि.०२/०८/१९५५ चे खरेदी दस्ताची सन १९९४ मध्ये अनाधिकाराने ००.२० आर क्षेत्राला नोंद करवुन घेतली. वास्तविक सदर नोंद धारताना सन १९५५ चे ७/१२ चे रेकॉर्ड पाहाणे जरुरीचे होते परंतु तसे न होता. अपिलार्थी याना कोणतीही कल्पना समज वा नोटीस न देता सदर फेर फार ची बेकायदेशीर पणे नोंद करवुन घेतली तिच मुलतः बेकायदेशीर व रद्द बातल आहे.

६. सन २०१५ मध्ये ग.नं.५० चे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये वाटप:- जाबदार व अन्य शेतकऱ्यांनी त्यांचे इतर जमीनीचे वाटप करताना त्यानी सदर वाटपात ग.नं.५० चा ही समाविष्ठ केला. परंतु सदर वाटपात अपिलार्थी यांना सामील न करता त्यांचे परस्पर अनाधिकाराने बेकायदेशीर पणे ग.नं.५० मधिल जादा क्षेत्र वाटपात आपले नावे लावुन घेतले व त्याचा ७/१२ सदरी अम्मल ही करवुन घेतला. जाबदार यानी ग.नं.५० चे ७/१२ सदरी चुकीच्या क्षेत्रांची नोंद यातील अपिलार्थी यांचे निदर्शनास आले नंतर अपिलार्थी यानी त्या बाबत तहसिलदार जत यांना रितसर अर्ज केला. सदर अर्ज क्र.हक्क नोंद/एस.आर/४७/२०२३ ने धरुन त्यांचे कामकाज चालुन दि. ०३/०५/२०२३ रोजी सदर दुरुस्ती आदेश पारीत करणेत आला. त्याची ७/१२ सदरी अम्मल झालेला आहे.

७. सदर अम्मल झाले नंतर जाबदार नं.१ यांनी परत दि.०४/०८/२०२३ रोजी क्षेत्र दुरुस्तो बाबत अर्ज केला. वास्तविक तहसिलदार जत यांनी क्र.हक्क नोंद/एस.आर/४७/२०२३ ने कामी दि.०३/०५/२०२३ रोजी आदेश दिलेला असताना, सदर आदेशावर जाबदार यांनी अपिल न करता, अनाधिकाराने दि. ०४/०८/२०२३ रोजी दुरुस्ती आदेश देऊन त्याचे कामकाज क्र.हनो/कलम/१५५/एस.आर/३६/२०२३ ने चालवुन दिलेला निर्णय अपिलार्थीवर अन्याय कारक आहे. सबब खालील मुद्दावर प्रस्तुत अपिल दाखल केलेले आहे.

८. खालील कोर्टानी दिलेला निर्णय एकाकी, न्यायतत्वांचे विरोध्दात देऊन अपिलार्थी वर घोर अन्याय केलेला आहे. खालील मे. कोर्टानी खरेदी दस्ता वेळचे ७/१२ व खरेदी दस्त यातील कथनांची तफावत पाहणेत चुक केलेली आहे. खालील कोर्टानी फेर फार नं. ८०२ ची नोंद करताना झालेल्या चुकांचा कांही एक विचार केलेला नाही.

९. सन. २०१५ मध्ये कलम ८५ खाली झाले वाटपातील चुकांचा विचार खालील मे. कोर्टानी केलेला नाही. क्रं. हक्कनोंद/कलम १५५/एस.आर/३६/२०२३ चा निर्णय देताना क्र. हक्कनोंद/एस.आर/४७/२०२३ चे कामी दिले निर्णयाची खालील मे. कोर्टानी कोणतीही दखल न घेता दिलेला निर्णय अपिलार्थी वर अन्याय कारक आहे. खालील मे. कोर्टानी चुकीचा निष्कर्ष काढुन दिलेला निर्णय न्यायीक तत्वांचे पुर्णपणे विरोधात आहे. वास्तविक फेर फार नं.८०२ ची नोंद हीच मुलतः बेकायदेशीर व रद्द बातल असताना त्यांची कोणतीही शहा निशा खालील मे. कोर्टानी केलेली नाही. वास्तविक सन १९५५ ला धोंडी धरु कोडग यांचे क्षेत्र केवळ 66११ (आकरा पै) असताना अनाधिकाराने बेकायदेशीर पणे जादा 626८ (दोन आणे आठ पै) क्षेत्राची झालेली खरेदी हीच मुलतः रद्द बातल आहे.

**जाबदार यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

**१.** वाद मिळकत ही जाबदार नं. १ यांचे वडील दत्तू पांडू कोडग यांनी श्री. धोंडी धारु कोडग यांचेकडून दिनांक: ०२/०८/१९७५ रोजी नोंदणीकृत खरेदीदस्त नं. ५६५/१९५५ अन्वये ० हे. २० आर, क्षेत्र कायमस्वरुपी खुषखरेदीपत्राने घेतलेली मिळकत असून, सदर खुषखरेदीपत्राची नोंद फेरफार नं. ८०२

अन्वये नोंद होवून खरेदी घेणार दत्तू पांडू कोडग यांचे नांव ७/१२ अभिलेखावर मालक व कब्जेदार सदरी नोंद होवून सदर मिळकतीमध्ये खरेदीदार दत्तू पांडू कोडग यांचे मालकी व कब्जेवहिवाट होती व आहेत. सदर दत्तू पांडू कोडग यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट करीत असताना मयत झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारसदार परशराम दत्तू कोडग व रंगराव दत्तू कोडग आबासाहेब दत्तू कोडग, बाबासाहेब दत्तू कोडग, बाजीराव दत्तू कोडग यांचे नांव वारसदार म्हणून नोंद झाले. त्यानंतर सदर खरेदी घेतलेल्या मिळकतीमधील ० हे. २० आर, क्षेत्र वारसदार जाबदार नं. १ परशराम दत्तू कोडग यांना ० हे. १० आर व रंगराव दत्तू कोडग मयत वारसदार मारुती रंगराव कोडग यांना ० हे. १० आर वाटपाने ठेवून त्याप्रमाणे वाटप दस्त तयार करुन तहसिलदार जत यांचेकडे क्र.हनों/वाटप/एस.आर./१२७/२०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९८७ अन्वये वाटप दावा दाखल करुन सदर वाटप दाव्यामध्ये वाद मिळकत खरेदी मालकी वहिवाटीतील मिळकत जाबदार नं. १ श्री. परशराम दत्तू कोडग यांना ० हे. १० आर वाटपात ठेवून सदर वाटपदस्ताप्रमाणे जाबदार नं. १ व मारुती रंगराव कोडग यांना 0 हे. १० आर, क्षेत्र सरस निरस मानाने वाटप करुन तहसिलदार जत यांचे कार्यालयात नमुना अ नियम ३ व नमुना व नियम ३ प्रमाणे नोटीस रुजु केल्यानंतर संबंधीत वाटपदस्तामधील वाटपदार यांनी मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून जाब जबाब देवून वाटप दस्तामध्ये नमुद केलेले हिस्से राशीनुसार क्षेत्र मान्य व कबूल केलेनंतर तहसिलदार जत यांनी दिनांकः २९/०४/२०१७ रोजी आदेश पारीत केले. वाटप आदेशाप्रमाणे मंडळ अधिकारी शेगांव व तलाठी आवंढी यांनी फेरफार नं. २१७९ अन्वये अंमल बजावणी देखील होवून ७/१२ हस्तलिखित अभिलेखावर मालक व कब्जेदार सदरी नोंद झालेली होती.

**२.** परंतु संगणकीयकृत ७/१२ अभिलेखावर नोंद घेत असताना नजरचुकीने जाबदार नं. १ यांचे क्षेत्र गट नंबर ५० मधील ० हे. १० आर वाटपदस्तामध्ये नमुद असताना व वाटप आदेशामध्ये देखील नमुद असताना, तलाठी व मंडल अधिकारी सो, शेगांव यांनी ७/१२ व ८ अ उताऱ्याबाबत संगणकिय कृत करण्याचे काम चालू असल्याने, सदर संगणकीयकृत करीत असताना, ७/१२ अभिलेखावर ऑनलाईन उताऱ्यावरती अंमल घेत असताना ० हे. १० आर, ऐवजी ० हे. ३.२४ आर क्षेत्र नजरचुकीने नोंद झाल्याने, सदर नजरचुकीने ० हे. ३.२४ आर क्षेत्र दुरुस्ती होवून पुर्वीप्रमाणे वाटप आदेशानुसार ० हे. १० आर इतके क्षेत्र पुर्ववत होवून ७/१२ अभिलेखावर अंमल करणेसाठी जाबदार नं. १ यांनी मा तहलिसदार सो, जत यांचेकडील क्र. हनों./ कलम १७५/एस.आर./३६/२०२३ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १५५ अन्वये क्षेत्रामध्ये झालेल्या तफावत दुरुस्त होवून मिळणेसाठी अर्ज दाखल केल्यानंतर मा. तहसिलदार सो, जत यांनी संपूर्ण गट नंबर ५० बाबत महसुल रेकॉर्ड व तलाठी आवंढी तसेच मंडल अधिकारी शेगांव यांचेकडील अहवाल मागवून जाबदार नं. १ यांचे क्षेत्र संगणकीयकृत उताऱ्यावरती नोंदी घेत असताना नजर चुकीने ० हे. १० आर, होणे गरजेचे असताना, नजरचुकीने ० हे.०३.२४ आर क्षेत्र बेकायदेशीर नोंद झाल्याबाबत निदर्शनास आल्यानंतर तहसिलदार जत यांनी क्र. हनों./कलम/१७५/एस.आर./३६/२०२३, दिनांक: १६/०२/२०२३ रोजी जाबदार नं. १ यांचा अर्ज मंजूर करून गट नं. ५० मध्ये परशराम दत्तू कोडग यांचे नांवे असलेले क्षेत्र हस्तलिखित ७/१२ उताऱ्यानुसार कब्जेदार सदरी ० हे. १० आर असे क्षेत्र पुर्ववत दाखल करणेबाबत आदेश पारीत केलेला आहे, तो आदेश कायदेशीर आहे. अपिलार्थी यांनी दिलेल्या अपीलामधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असल्याने जाबदार नं. १ यांना मान्य व कबूल नाही.

**प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तिवाद, प्रकरणी दाखल उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

**१.** मौजे. आवंढी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ५० या मिळकती संदर्भात तहसिलदार जत, यांनी क्र.हनो/कलम/१५५/एसआर/३६/२०२३, दिनांक १६.०२.२०२४ रोजीच्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

२. तहसिलदार जत यांचेकडील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अंतर्गत दिलेला दुरूस्ती आदेश क्र.हनो/कलम-१५५/एसआर/३६/२०२३ दिनांक १६.०२.२०२४ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करता मौजे आवंढी ता.जत येथील गट नंबर ५० मधील परशराम दत्तू कोडग यांचे नांवे ०.०३.२४ हे.आर ऐवजी ०.१० हे.आर क्षेत्र नमूद करणेबाबत आदेश देणेत आलेला आहे. वास्तविक यापुर्वी तहसिलदार जत यांनी तलाठी आवंढी व मंडळ अधिकारी शेगांव यांचेकडील संयुक्त अहवाल जा.क्र ०२/२०२३, दिनांक २५.०४.२०२३ विचारात घेवून सर्व कागदपत्रांची पडताळणी करून क्र.हक्कनोंद/एसआर/४७/२०२३ दिनांक ०३.०५.२०२३ रोजी आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशाने अधिकार अभिलेख सदरी नोंदी होवून अपिलार्थी यांचे नांवे ००.५४.०२ हे.आर व जाबदार ०१ यांचे नांवे ००.०३.२४ हे.आर क्षेत्र नमूद केलेले आहे. सदर आदेश व सदर आदेशाचे अनुषंगाने झालेला फेरफार आज अखेरे कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही. उक्त क्र.हक्कनोंद/एसआर/४७/२०२३ दिनांक ०३.०५.२०२३ चा आदेश अबाधित असतांना पुन्हा तहसिलदार जत यांनी क्र.हनो/कलम-१५५/एसआर/३६/२०२३ दिनांक १६.०२.२०२४ ने क्षेत्रात दुरूस्तीचा दिलेला आदेश कायदेशीर ठरत नाही.

३. उपरोक्त विवेचनावरून तहसिलदार जत यांनी दिलेला निर्णय हा योग्य ठरत नसल्याने तो रद्द करणे आवश्यक ठरणार आहे. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज हा मान्य करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे तहसिलदार जत यांचेकडील आदेश क्र.हनो/कलम-१५५/एसआर/३६/२०२३, दिनांक १६.०२.२०२४ हा रद्द करण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक - २४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.